# .. Blessings by Bharat to Lokamanya Tilak ..

## ॥ लोकमान्यास भारतवर्षाचा आशीर्वाद ॥

The day Lokmanya Tilak first went to England to demand independence for India Ram Ganesh Gadkari wrote the following lines. I present them here. How valuable was Indian Independence is reflected in these verses and in the process Gadkari has described illustrious history that should make us all proud. Today, we seem to take it for granted. It is sad that today even middle class and so called cultured individuals are found saying, "what has anyone achieved by being honest or principled?" That is a separate topic of discussion altogether. Whatever you do at least pay attention to following verses and think for yourself. Figure out that line between ambition and malevolence or else the time is the cruelest punisher of them all.

Surin

लोकमान्यास भारतवर्षाचा आशीर्वाद !

चाल : चंद्रकांत

अमृतसिध्दि हा योग मंगलचि जग सगळें गाय ॥
"महाभाग जन! सुखं गम्यतां पुनर्दर्शनाय"

जें जें नश्वर गेलें निघुनी काळाच्या पाठीं ॥
अमृत तेवढें उरलें केवळ या दिवसासाठीं ॥

अंधाराची वाट कंठिली फिरलो संकष्टीं ॥
चार युगांचि रात्र भोगिली या दिवसासाठीं ॥

रोज उगवला, रोज परतला, होउनि बहु कष्टी ॥
आनंदे रवि आज उगवला या दिवसासाठी ॥

दक्षिणसागर होउनि घटिकापात्र निरभिमान ॥
मोजित होता या दिवसाचें मंगल घटिमान ॥

गंगासिंधू धांवत होत्या आंदोलित हृदया ॥
या दिवसाच्या या सूर्याला अर्घ्योदक द्याया ॥

स्वस्ति वाचना सिंहगडावर चढला गगनांत ॥



From http://sanskritdocuments.org

थरथरुनी श्रीतानाजीचा तो तुटका हात ॥

मंगल ह्रदया बघे पांचही करुनि प्राण गोळा ॥
पंजाबी सिंहाचा दुसरा फुटकाही डोळा ॥

व्यासवाल्मिकीकालिदास कवि आळवित बसले ॥
या दिवसाच्या भूपाळीस्तव वाङ्मय तें तसलें ॥

योगिवृंदगिरिकंदरिं बसुनी लावुनि अवधान ॥
पहात होते या दिवसाचें चिन्मंगल ध्यान ॥

आर्यभट्ट मिहिरादि काढुनी गगनाचा ठाव ॥
हुडकित होते या दिवसाचें एक रासनांव ॥

सोरठचा श्रीसोमनाथही या दिवसासाठीं ॥
पडे त्रिस्थळीं फुटुनि लागतां महंमदी काठी ॥

तिष्ठत अठ्ठावीस युगांवर भीमेच्या कांठी ॥
खडा पहारा पांडुरंग करि या दिवसासाठीं ॥

अठरा पद्में सेना योजुनि जलधीच्या पाठीं ॥
श्रीरामांनी सेतु जोडिला या दिवसासाठीं ॥

अठरा अध्यायाची गीता एक मुक्तकंठीं ॥
रणीं गाइली श्रीकृष्णांनी या दिवसासाठीं ॥

फितुरगडावर आग लागली या दिवसासाठीं ॥
पानपतावर रक्त सांडिलें या दिवसासाठीं ॥

पोट बांधुनी वेद राखिले सरस्वतीकांठीं ॥
पुण्याई ती सर्वहि केवळ या दिवसासाठीं ॥

जन्मा येतो बाळ टिळकही या दिवसासाठीं ॥
जन्मति श्रीमान् पंचम जॉर्जहि या दिवसासाठीं ॥

-गोविंदाग्रज उर्फ राम गणेश गडकरी



From http://sanskritdocuments.org

Encoded and proofread by Surin Usgaonkar usgaonkar at hotmail.com

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated December 3, 2005

sanskritdocuments.org



From http://sanskritdocuments.org